वाचले :- १) शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ रेठरे बु।। ता कराड ता. वाळवा जि. सांगली करिता श्री.विलासराव तुकाराम पाटील खजिनदार यांचा दि.२९/११/२००७ चा अर्ज.

२) सहाय्यक संचालक नगर रचना सांगली यांचे कडील पत्र जा क्र.सांशा/ रेखांकन/कि म गड ता.वाळवा/ग.नं. ३१९/१,३२० /वाळवा/ससं सा.१३२६. दिनांक.१६/१२/२००८.

३) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे कडील परिपत्रक क्र.एनएपी /१०८८ /प्र.क्र. /१३१५/ल/२ दिनांक - २८/२/८९

४) मा.जिल्हाधिकारी साहेब सांगली यांचे कडील आदेश क्र.आरबी/एलएनडी/आरआर/७० दिनांक - १२/१/१९९३

---

क्र.एनए/एस आर/ २४ /२००८
उपविभागीय अधिकारी वाळवा
विभाग इस्लामपूर यांचे कार्यालय
दिनांक - २० /१२/२००८

विषय :- मौजे कि म गड ता.वाळवा येथील अनुक्रमे
स.नं. ३१९/१, क्षेत्र ९ हे २७ आर, पोख ०.८६ पैकी ७३३००.३६ चौ.मी
स.नं. ३२० क्षेत्र ५ हे ०३ आर, पोख ०.७७ पैकी ४३५००.०० चौ.मी
क्षेत्रास यांचा शैक्षणीक कारणासाठी बिनशेती परवानगी बाबत...

# आदेश

महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये दिले तरतुदीनुसार व प्राप्त झाले अधिकारान्वये मी,उपविभागीय अधिकारी वाळवा विभाग इस्लामपूर मौजे मौजे कि म गड ता.वाळवा येथील अनुक्रमे स.नं. ३१९/१, क्षेत्र ९ हे २७ आर, पोख ०.८६ पैकी ७३३००.३६ चौ.मी स.नं. ३२० क्षेत्र ५ हे ०३ आर, पोख ०.७७ पैकी ४३५००.०० चौ.मी क्षेत्रास यांचा शैक्षणीक कारणासाठी बिनशेती परवानगी परवानगी देत आहे.

| गावाचे नांव | स.नं./ग.नं. | क्षेत्र | बिनशेती वार्षिक आकार |
|---|---|---|---|
| कि म गड | ३१९/१<br>३२० | क्षेत्र ९ हे २७ आर, पोख ०.८६ पैकी ७३३००.३६ चौ.मी<br>क्षेत्र ५ हे ०३ आर, पोख ०.७७ पैकी ४३५००.०० चौ.मी | रक्कम रुपये ११६८४/-<br>+<br>लोकल फंड |

शर्ती व अटी--

१) सहाय्यक संचालक नगर रचना सांगली यांचे कडील पत्र जा क्र.सांशा/ रेखांकन/कि म गड ता.वाळवा/ग.नं. ३१९/१,३२० /वाळवा/ससं सा.१३२६. दिनांक.१६/१२/२००८.अन्वये दिलेल्या अटींचे पालन करणेचे आहे.

२) सदर क्षेत्राचा वापर शैक्षणिक कारणासाठीच करणेचा आहे.

३) रेखांकनातील भुखंडाची विभागणी पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

४) रेखांकनाप्रमाणे भुखंड,रस्ते खुली जागा इमारतीची प्रत्यक्ष जागेवर आखणी करुन ती तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेकडून मंजूर करुन घेणेचे आहे.

५) रेखांकनाची जागेवर आखणी केलेनंतर त्यातील रस्ते आजूबाजूच्या जमिनीतील रेखांकने मंजूर झाली असतील तर त्यातील रस्त्यांशी समन्वय साधने आवश्यक आहे.

६) मंजूर केलेल्या रेखांकनामधील नियोजित केलेल्या खुल्या जागेवर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम न करता ती तशीच निरंतर खुली ठेवावी लागेल.

७) रस्ते खुलीजागा आणि गटर्स बांधून रस्ते तयार करुन अर्जदार यांनी ग्रामपंचायतीच्या ताब्यात दिले पाहिजेत.

८) आदेश पारित केले तारखेपासून १ वर्षाच्या आत सदर जागेचा शैक्षणिक कारणासाठी वापर करणेचा आहे. तसे न केलेस बिनशेती आदेश रद्द करणेत येईल.

९) अर्जदार यांनी प्रश्नाधिन जमिनीचा आकार प्रती चौरस मिटर ००.१०पैसे या दराने व त्यावरील फंड सरकारी खजिन्यात प्रत्येक वर्षी जमा करणेचा आहे. सदर दराबाबत शासनाकडून होणा-या बदलानुसार अकृषिक आकार भरणे बंधनकारक आहे.

१०) अर्जदार यांनी बिनशेती कामी बिनशेती आकार १०५,५५६/— + ८३ + अधिक लोकल फंड होणारी रक्कम रुपये १२८,८७६/- सरकारी खजिन्यात (स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा इस्लामपूर येथे) दि.२०/१२/०८ रोजी जमा केलेली आहे. त्याचा चलन क्रमांक- ०००८५ आहे.

११) बिनशेती जागेचा शैक्षणिक कारणासाठी वापर केलेबाबत अर्जदार यांनी गावकामगार तलाठी यांचे मार्फत ३० दिवसाचे आत तहसिलदार यांना लेखी कळविले पाहिजे. तसे न केलेस अर्जदार हे नियम १९६९ चे कलम ६ प्रमाणे उपविभागीय अधिकारी निश्चित करतील तितक्या दंडाच्या आकारणीस पात्र राहतील.

१२) अर्जदार यांनी होणारी मोजणी फी ची रक्कम तालुकानिरीक्षक भुमी अभिलेख वाळवा इस्लामपूर यांचे कडे या आदेशाचे दिनांकापासून १५ दिवसाचे आंत भरणेची आहे.

१३) अर्जदार यांनी दर १०० चौ.मी. ला एक झाड लावणेचे आहे.

१४) भुखंडावर बांधकाम करणेपूर्वी संबंधित सक्षम अधिकारी यांचेकडून बांधकामाचा नकाशा मंजूर करुन घेवून नंतर बांधकाम करणेचे आहे.

१५) अर्जदार यांनी केले बांधकाम हे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम (अकृषिक वापर) नियम १९६९ मधील सुची २ व ३ मधील तरतुदीनुसार करणेचे आहे.

१६) अर्जदार यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६९ मधील सुची ४ मध्ये रितसर सनद व कबुलायत करुन देणेची आहे.

१७) अर्जदार यांनी वरील अटीस अनुसरुन बांधकाम न केलेस ते नियमबाहय केले असलेचे निदर्शनास आलेस ते केलेले बांधकाम सरकारी खर्चाने काढून टाकून होणारा खर्च अर्जदार यांचेकडून वसूल करणेत येईल.

१८) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित इस्लामपूर विभागीय कार्यालय इस्लामपूर यांचे न का अ /इस्ला सा/७०/७३९१ दि.१७.१२.२००८ च्या पत्रातील सर्व दिलेल्या शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

१९)आरोग्य विभाग जिल्हा परिषद सांगली जा.क्र.आरोग्य/जाग. तपासणी/४९६/२००८ दि.०८/१२/२००८ च्या पत्रातील सर्व दिलेल्या शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

२०) उप- अभियंता वाळवा पंचायत समिती,इस्लामपूर (इ व द) यांचे पत्र क्र जा क्र बांधकाम /वशी /रेशा-२ ९६६/०८ दि.३.१२.२००८ च्या पत्रातील सर्व दिलेल्या शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

२२) उप अभियंता सार्व.बांधकाम उपविभाग इस्लामपूर यांचे पत्र क्र जा क्र सा बां /उ.प्र /सं/१२८९/०८ दि.३.१२.२००८ च्या पत्रातील सर्व दिलेल्या शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

२३) वरील वाचले क्र. २ व ३ च्या पत्रातील सर्व दिलेल्या शर्ती व अटी बंधनकारक राहतील.

२४) प्रश्नाधिन बिनशेती क्षेत्रामध्ये इमारत बांधकाम करताना रिबन डेव्हलपमेंटचा भंग करणेचा नाही.

२५) उपरोक्त अटी व्यतीरिक्त इतर जादा अटी बिनशेती आकारातील बदल,दंड इत्यादी बदलणेचे अधिकार उपविभागीय अधिकारी वाळवा विभाग इस्लामपूर यांना आहेत.

२६) वरील नमुद केले शर्तीचा व अटींचा भंग झालेस देणेत आलेली बिनशेती परवानगी रद्द करणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

सही/-

**उपविभागीय अधिकारी**
**वाळवा विभाग इस्लामपूर**

प्रति,

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळे रेठरे बु।। ता कराड रा.कि.म.गड ता. वाळवा जि. सांगली करिता श्री.विलासराव तुकाराम पाटील खजिनदार

प्रत :- तहसिलदार वाळवा.इस्लामपूर

२/- सदर आदेशाप्रमाणे गाव नमुना नंबर २ व तालुका नमुना नंबर २ ला नोंद घेणेत यावी गा.का.तलाठी यांना जरुर त्या सुचना देणेत याव्यात तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांचेकडून कमी जास्त पत्रक तयार करुन घेवून जरुर तो अंमल अधिकार अभिलेखा मध्ये द्यावा.

प्रत :- तालुकानिरीक्षक भुमी अभिलेख,वाळवा यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- सहाय्यक संचालक नगर रचना सांगली यांना माहितीसाठी.
प्रत :- मंडळ अधिकारी ताकारी

२/- प्रश्नाधिन जमिनीचा वापर बिनशेती आदेशापूर्वी करणेत आला असेल तर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये प्रस्ताव सादर करावा.

प्रत :- गांवकामगार तलाठी कि.म.गड यांना पुढील उचित त्या कार्यवाहीसाठी रवाना.